छत्रपती शिवाजी राजांची जलनीती

प्रा. मंगला गोरे
महिला महाविद्यालय, नागपूर

Crossref DOI -

छत्रपती शिवाजीराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून नरक यातना भोगणारयांना जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. आदिलशाहीकडून ज्या भूमीवर गाढवाचा नांगर फिरविला त्या भूमीत लोक वस्ती करायला सुद्धा तयार नव्हते, ही अंधश्रद्धा असली तरी त्या अंधश्रद्धेला आव्हान देणे ही सोपी गोष्ट नव्हती. अशा भूमीत सोन्याचा नांगर फिरवून खऱ्या अर्थाने ती जमीन सोन्यासा समृद्द बनवली ते आव्हान स्वीकारून अंधश्रद्धेला फाटा दिला. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून चालणार नव्हते तर त्याचे रूपांतर स्वराज्यात करायचे होते आणि ते करण्यासाठी शिवाजी राजांची दूरदृष्टी होती. त्यांनी मानवी कल्याणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणाऱ्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कल्पने पलीकडची धोरणे आखून त्याची अंमलबजावणी केलेली आहे. छत्रपती शिवाजी राजांनी राष्ट्रनिर्माणासाठी आवश्यक घटकांचा विचार केला. त्यामध्ये जलनिती अनन्यसाधारण आहे

आधुनिक काळातील 'पाणी अडवा पाणी जिरवा' हे त्या काळात शिवाजी राजांना कळून चुकले होते.पाणी हे निसर्गाकडून मानवाला मिळालेली देणगी आहे. संपूर्ण सजीव सृष्टी पाण्यावर अवलंबून आहे म्हणूनच पाण्याचे योग्य नियोजन गरजेचे आहे हे त्यांनी तेव्हाच ओळखले होते. म्हणूनच ते केवळ धरणे बांधून थांबले नव्हते; तर त्यातून कालवे निर्माण करून त्यातून जलसिंचनाच्या सुविधा निर्माण केल्या होत्या.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. मध्ययुगीन भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या जलव्यवस्थापन धोरणाचा अभ्यास करणे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापनाचे धोरण जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे.
3. पाणी हे निसर्गाचे अनमोल देण आहे त्याला वाचविण्याच्या दूरदृष्टीचा अभ्यास करणे.
4. स्थानिक प्रादेशिक महत्त्व जाणून छत्रपती शिवाजी महाराजांनी जल व्यवस्थापन केले त्याचा अभ्यास करणे.
5. सद्यस्थितीतील जल व्यवस्थापनाचे महत्त्व जाणून घेणे.

दुर्ग हे राज्याचे सार :

शिवाजी राजांना **'Man of the Fort'** म्हटले जाते. दुर्ग हे राज्याचे सार होय, स्वराज्यात गड/दुर्ग बांधताना शिकायांनी प्रत्येक किल्ल्यावर सर्वात प्रथम काटेकोरपणे उतम जल व्यवस्थापन, केले होते.सह्याद्रीच्या प्रदेशात व भारतामध्ये फक्त चार महिने पाऊस पडतो त्यामुळे राजांनी प्रत्येक किल्ल्यावर पाणी सठवण्याची व्यवस्था केली आणीबाणीच्या काळात पाणीसाठा सुस्थितीत कसा राहील याची काळजी घेऊन त्याचे नियोजन शिवरायांनी

केलेले होते. शिवाजी राजांनी किल्ल्यामध्ये खाणी किवा दगडाच्या उतरणीवर खोल खड्डे निर्माण करून पाणी सतत पाझरत राहील अशी व्यवस्था केली. तसेच जलाभेद्य खडक असल्यास अलगद बाजूस करून पाणी पाझरत राहिल किवा खडक तासून तलाव निर्माण केले वर्षभर पाणी पुरेल जलसाठा निर्माण करण्याकडे लक्ष दिले.

किल्ल्याच्या बांधकामासाठी लागणारा दगड मिळविण्यासाठी किल्ल्याच्या विशिष्ट जागी खाणी खोदल्या जात असे. या खाणीतून दगड तर उपलब्ध होत असे. शिवाय पाण्याच्या पावसाचा संचय करण्याची व्यवस्था देखील होत असे. प्रत्येक किल्ल्यावर आपल्याला झरे, तलाव, टाकी किंवा विहिरी यांच्या माध्यमातून पाण्याची व्यवस्था केलेली दिसते. पाण्याशिवाय गड हा अशक्यच आहे. इतिहासात अनेक वीर योध्ट्यांची तहान याच पाणी साठयांनी भागविली आहे आणि याच पाण्याने शत्रूला पाणी पाजण्याची ताकद देखील दिली आहे.

आज्ञापत्रानुसार उदक पाहून गड किल्ला बांधावा. ज्या ठिकाणी पाणी नाही त्या ठिकाणी गडाची बांधणी आवश्यक असेल तर आधी खडक फोडून त्या ठिकाणी तळी, पाण्याचे मोठे मोठे टाके बांधावे. जेणेकरून पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल गडावर जिवंत पाण्याचे झरे असतील ते शोधावे त्याचा वापर करावा त्या झऱ्यांचा वापर करून तळी बांधावी. त्या तळ्यातील गाळ वेळोवेळी उपसून पाणी स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. पाणी पुरते म्हणून तितक्यावरच निश्चित न राहता इतर ठिकाणी देखील पर्यायी तळी किंवा टाके बांधून काढावे. पाणी बिनकामी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी जतन करून टिकवावे गड व पाण्याच्या देखभालीसाठी लोक कामी ठेवावी यासाठी त्यांना आवश्यक असलेली अवजारे हत्यारे द्यावी, गडावरील शिबंदीला वर्षभर पाणी कसे पुरेल याचे चोख व काळजीपूर्वक नियोजन केले होते.

किल्ल्यावरील जल व्यवस्थापन :

छत्रपती शिवाजी महाराज हे स्वतः एक वास्तुविशारद होते. त्याचबरोबर त्यांनी आपल्या त्यांनी आपल्या स्वराज्यातील वास्तुविशारदांची मदत घेतल्याचे दिसून येते. स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्यावर जल व्यवस्थापन करण्यासाठी हिरोजी इंदुलकर या वास्तुविशारदाच्या देखरेखीखाली बांधकाम केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड जेव्हा जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांकडून जिंकून घेतला तेव्हा ते म्हणतात की, तख्तास हाच जागा करावा म्हणूनच रायगडाची पुनर्बाधणी केली. या किल्ल्याची पुनर्बाधणी करताना त्यांनी वास्तुविशारद व जाणकारांची मदत घेतली. जल व्यवस्थापनासाठी लागणारे दगड, चिरे रायगडाच्या डोंगरातून फोडून जमा केले. त्या ठिकाणीचा दगड फोडला त्या ठिकाणी खोदलेल्या जागेवर मोठमोठे तलाव बांधून रायगडावर मुबलक पाणी साठा उपलब्ध करून दिला. रायगडावरील राजवाड्याच्या समोर बांधलेला गंगासागर तलाव हा सर्वात मोठा जलसाठा असलेला तलाव होय, कोळीम तलाव, कुशावर्त तलाब, हत्ती तलाव, काळा तलाव आणि सध्या वापरात नसलेले तीन तलाव असे एकूण आठ ते दहा तलाव रायगडावर आहेत.या तलावाच्या सोबतच गडावर जवळजवळ ७५ पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. प्रत्येक किल्ल्यावर भरपूर मुबलक पाणीसाठा असायचा पन्हाळगडावर गंधार बावडी 17/36 ही वैशिष्ट्यपूर्ण विहीर आहे, ती तीन मजली विहीर असून या विहिरीतील पाण्याचे स्त्रोत गडावरील शिबंदीस पाण्याची कमतरता भासू देत नसत. सिंहगडावरील गावकऱ्याचा म्हणणं आहे की आजही आम्ही गडावरील देव टाक्यातील पाणी पिण्यासाठी वापरतो कारण ते थंड शुद्ध आणि चवीला चांगले आहे. पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी पाण्याचे टाके कपारीला कोरलेले आहेत. भोवताल मोठ्या प्रमाणावर झाडे लावली

जी जमिनीची होणारी धूप थांबवेल व पर्यावरण ही संतुलित राहील पावसाळ्यात जास्तीचे झालेले पाणी वाहून नेण्यासाठी सांडवाही काढला जात असे.

महाराजांच्या स्वराज्याचा इतिहास अभ्यासताना अनेक जलदुर्गांचा उल्लेख येतो या जलदुर्गांवर सुद्धा महाराजांनी चोख जल व्यवस्थापन केली होती. चारीही बाजूने खारट पाणी असून सुद्धा किल्ल्यावरील तलावात किंवा विहिरीत गोड पाणी आहे. असे अनेक जलदुर्ग पाहताना छत्रपती शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापन किती वैशिष्ट्यपूर्ण व अनन्यसाधारण होते हे दिसून येते. छत्रपती शिवाजी राजांनी रायगडाच्या पायथ्याशी आपल्या मातोश्री जिजाऊ माँ साहेबांसाठी पाचाडला बांधलेल्या वाड्यात दोन विहिरी आहेत. विशेष म्हणजे एका विहिरीला खाली उतरण्यासाठी दगडी पायऱ्या असून वर मजबूत दगडी बांधकाम केले आहे. त्यावर दगडी बैठक आहे. या विहिरीला 'तक्क्याची विहीर' असे म्हणतात. महाराजांनी जिजाऊंना बसण्यासाठी तर कधी स्वतः प्रजेशी संवाद साधण्यासाठी ती खास बनवून घेतली असावी एका मराठमोळ्या राजाचे जीवन आणि जिव्हाळा जपणारी साधीसुधी मराठमोळी विहीर अनेक शिवप्रसंगाचे साक्षीदार ठरलेली आहे.

शेती आणि जल व्यवस्थापन :

शेती हा स्वराज्यातील महत्त्वाचा व्यवसाय होता म्हणूनच शेतीचे पीक-पाण्याचे नियोजन करण्यासाठी त्या काळात त्यांनी जल व्यवस्थापन केले होते. एका पर्जन्यकाळापासून दुसऱ्या पर्जन्य काळापर्यंत पाणी पुरेल याची छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि त्यांच्या स्थापत्य विशारदाने अंदाज घेऊन गडावरील तलाव विहिरी बांधण्यात आले. योग्य वेळी व योग्य प्रमाणात पाऊस पडला तर धान्य भरपूर पिकते आणि गवत चाऱ्याचेही चांगले पोषण होते. याची जाणीव त्यांना होती. आपले स्वराज्य हे शेतीच्या बांधावरील रयतेसाठी आहे. त्यामुळेच त्यांनी हे जल व्यवस्थापन केलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर दगडात बनवलेले हे पर्जन्यमापक यंत्र कुशावर्त तलावाजवळ मंदिराच्या पाठीशी बांधले होते. वर्षाला सरासरी किती पाऊस पडतो हे पर्जन्यमापकामुळे समजत असल्यामुळे त्यांना जल व्यवस्थापन करता आले. शेतीच्या पीक पाण्याचे नियोजन करण्यासाठी त्या काळात हे अतिशय महत्वाचे साधन होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापन तंत्र :

छत्रपती शिवाजी महाराजांनी जलव्यवस्थापनाच्या बाबतीत केलेली ही क्रांती म्हणजे एक 'जीवन क्रांती' आहे शिवाजीराजांनी अनेक वर्षांपूर्वी जलव्यवस्थापन केलेले आहे. त्याला आजही तितकेच महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज कोणत्याही ठिकाणी अडचणीत किंवा स्वारीवर असतील तरीही त्यांना रयतेची काळजी वाटते. आग्रा येथे नजर कैदेत असताना त्यांनी हिरोजी इंदुलकर यांना एक पत्र पाठवले होते. त्यात ते लिहितात, 'आमचे लक्ष सिंधुदुर्ग स्थिरावले हे बरे जाणणे, अवघे काम चखोट करणे, वाळू गोड्या पाण्यामध्ये चार-दोनदा भिजून देणे. खारटापण धुतले जाईल. ती धुतलेली वाळू वापरणे.' छत्रपती शिवाजी महाराज मोगलांच्या हजारो सैन्यांच्या गराड्यात असूनही ते सकारात्मक आणि सूक्ष्म विचार करीत होते. त्यामुळे आजच्या सध्या परिस्थितीतही महाराजांचा आदर्श आपण सर्वांनी डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे, महाराजांच्या काळातील जलसंचय व्यवस्थापनाचे तंत्र आजही दगडखाणी बांधताना, खोदकाम करताना, विहिरी, तलाव व कालवे बांधताना वापरले पाहिजे. यामुळे

आपणास महाराजांचा जल व्यवस्थापनाचा वारसा जतन करता येईल.

छत्रपती शिवाजी महाराजाना स्वराज्य उभारताना त्यांना जसे एकनिष्ठ मावळे मिळाले त्याचप्रमाणे भौगोलिक आणि प्रादेशिक घटकांचीही मदत मिळाली. किंबहुना त्यापेक्षा खूप मोठ्या प्रमाणात त्यांनी निसर्गाचा भौगोलिक प्रदेशांचा योग्यतेनुसारच वापर करून स्वराज्याचा विकास करून घेतला. हिंदवी स्वराज्याचे संरक्षणासाठी जे किल्ले उपलब्ध होते. त्यात काही किल्ले हे प्राचीन तर काही मध्ययुगीन तसेच काही किल्ले महाराजांनी स्वतः बांधलेले आहेत 'मराठा सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथाचे ग्रंथकरतें न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणतात की, 'छत्रपती शिवाजी महाराजांना जणू काही भविष्यात घडणाऱ्या घटनांची माहिती होती म्हणूनच त्यांनी भविष्याचा विचार करून जल व्यवस्थापन केल्याचे दिसून येते.

सारांश :

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व त्यांनी केलेले जल व्यवस्थापनाचे कार्य म्हणजे एक प्रकारची 'जीवनक्रांती' व 'जलक्रांती' आहे. ही क्रांती आपणास वेळोवेळी प्रेरणा देत राहील. त्यांनी बांधलेले किल्ले, इमारती, तलाब व विहिरी हे सर्व रयतेच्या कल्याणासाठी केलेले कार्य आहे. हे सर्व त्यांनी दुर्गम भागात उभे केलेले कार्य आहे. शत्रूच्या तुफानी आक्रमणाच्या वेळी सर्वांना सुरक्षित राहण्यासाठीच अशा भागाची निवड केलेली होती. म्हणूनच ते दक्षिण भारतातील आद्य भूराजनीतज्ञ व जलनीतज्ञ म्हणून ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांचे हे जल व्यवस्थापनाचे कार्य हे कधीही न मोजता येणारे व्यापक होते.

इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर, मातीच्या कणावर आणि जनतेच्या मनावर आँधारलेले लोककल्याणकारी राज्य होते. मानवी जीवन सुखी समृद्धी करायचे असेल तर जल व्यवस्थापनाला महत्त्व दिले पाहिजे अन्यथा भविष्यात पाण्यासाठी युद्ध होणार नाही हे सांगता येत नाही. आज संपूर्ण जगामध्ये तापमान वाढल्याने पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या विचारांमधून, धोरणामधून एक नवी दिशा आपणांस मिळते व आजही ते विचार निश्चितच प्रेरणादायी व दिशादर्शक आहेत. आजही पाण्याची साठवणूक करणे, नियोजन करणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रनिर्माणासाठी आवश्यक घटकांचा विचार केला. त्यामध्ये जलनिती या घटकाला अनन्यसाधारण महत्त्व देऊन त्याचा वापर करून राष्ट्रसमृद्ध केले म्हणून शिवाजी महाराज हे युग प्रवर्तक ठरले.

संदर्भग्रंथ :

- अ.रा कुलकर्णी आणि ग. ह. खरे, मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला.
- डॉ. पवार जयसिंगराव, शिवछत्रपती एक मागोवा.
- न्यायमूर्ती मा. गो. रानडे, मराठा सत्तेचा उत्कर्ष.
- केळुसकर, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र.
- वा.सी. बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र.